नि.फौ.ख.क्र. ३२७४/२०२२
सरकार वि. मो.जाकीर वगैरे
निशाणी क्र. ४९

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ४ यांची शपथेवर सरतपासणी सुरू</u>**

| मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, | | |
|---|---|---|
| नाव | – | शब्बीर कुरेशी गफुर कुरेशी |
| वय | – | ७४ वर्षे |
| धंदा | – | निरंक |
| राहणार | – | गडडीगोदाम पोलीस चौकीजवळ, नागपूर |

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून</u>**

**१.** फिर्यादी साजीद माझा मुलगा आहे. झेबा अमन सोबत साजीदचा विवाह झाला होता. परंतु त्यांचे आपापसात पटत नव्हते. त्याबाबत एकमेकांविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रारी दाखल केल्या होत्या. झेबा अमन दिड वर्षापासुन माहेरी राहत होती. झेबा तिचे सगळे सामान घेवुन गेली होती. दिनांक २६.०४.२०२२ रोजी सिलींग फॅन घेवुन जाण्याकरीता झेबा, तीची बहीण, बहीणीचा नवरा आणि बहीणीचा दिर यांच्यासोबत संध्याकाळी ४ च्या सुमारास आली होती. ते सिलींग फॅन काढत होते त्यावेळेस साजीद घरी आला. साजीद घरी आला त्यावेळी झेबाचा जिजा जाकीर कुरेशी याने साजीदला हातबुक्कीने मारहाण केली. साजीदच्या नाकातुन रक्त वाहु लागले. त्यानंतर चौघांनीमिळुन साजीदला मारले, त्यामुळे साजीद तेथुन जीव वाचवुन पळुन गेला. त्यानंतर ते चौघे माझ्याघरी आले आणि मला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. साबीर कुरेशीच्या हातात लोखंडी पाईप होता. त्याने लोखंडी पाईपने अल्टो कारची समोरची काच फोडली आणि कारचे छत चेंबवले आणि कारचे साधारण ८ ते ९ हजाराचे नुकसान केले. त्यानंतर मी सदर पोलीस स्टेशनला गेलो आणि घटनेबददल माझा जबाब दिला. मी चारही आरोपींना ओळखु शकतो. (आरोपीच्या विदयमान वकीलांनी आरोपी क्र.१ ते ४ यांची ओळख नाकारली नाही.) पोलीसांनी साजीदला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटलला नेले. डॉक्टरांनी सांगितले की, साजीदच्या नाकाचे हाड फ्रॅक्चर झाले आहे.

**<u>साक्षीदाराचा उलटतपास आरोपी क्र.१ ते ४ तर्फे वकील श्री शेख सबाहत</u> –**

**२.** मी दिनांक २६.०४.२०२२ रोजी सदर पोलीस स्टेशन येथे आरोपींनी गाडीचा काच फोडल्याबाबत तक्रार केली होती. मला तक्रारीची प्रत मिळाली नाही. माझे आणि फिर्यादीचे घर वेगवेगळे आहे. दिनांक २६.०४.२०२२ रोजी मी माझ्या घरी होतो. दिनांक २६.०४.२०२२ रोजीचा जबाब मी वाचला होता. हे म्हणने खरे आहे की, फिर्यादीने मला घटनेबददल सांगितले किंवा मी घटना पाहीली असे नमुद नाही. हे म्हणने खरे नाही की, मी कोणतीही घटना पाहीली नाही आणि फिर्यादीने मला घटनेबददल सांगितले नाही, म्हणुन माझ्या जबाबात ते नमुद नाही.

**३.** कार माझ्या मालकीची होती हे दाखवण्याकरीता कारचे कागदपत्र पोलीसांना दिले नाही. मी कारचा इंशुरंस क्लेम केला नाही. हे म्हणने खरे नाही की, कारची काच फुटली नाही आणि छत चेंबले नाही म्हणुन मी कारचा इंशुरंस क्लेम केला नाही. पोलीसांनी दिनांक २६.०४.२०२२ नंतर माझा जबाब नोंदवला नाही. हे म्हणने खरे नाही की, मी सरतपासात नमुद केलेले कथन खोटे आहे.

**४.** हे म्हणने खरे नाही की, माझ्या मुलाचे आणि त्याच्या बायकोचे आपापसात पटत नसल्यामुळे मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, माझे सुनेशी पटत नाही म्हणुन मी वेगळे राहतो. हे म्हणने खरे नाही की, मी कोणतीही घटना घडली नसतांना मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>**

**<u>फेरतपास काही नाही</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत माझे समक्ष,

नागपूर (श्रीमती. एस.टी. दंडे)
दिनांकः–२९.०४.२०२४ मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर